
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ख्या. वा.
दा. क्र. २००८




BVBK-0402994

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २९९४ दिनांक ८।७।९४
विभाग बा. वा.

बा. वा.
२९९४
८।७।९४


# राणीची बाग

कविः विंदा करंदीकर
चित्रकारः वसंत सरवटे



BVBK-0402994


पॉप्युलर प्रकाशन, मुंबई



## राणीची बाग


स्वप्नांत पाहिली
राणीची बाग;
हत्तीच्या पाठीवर
बसला नाग.

हरणांच्या बरोबर
खेळत पत्ते
बसले होते
दोन चित्ते.




माकड होतें
सांगत पुराण;
उंट होता
वाचीत कुराण

सिंह होता
व्याख्यान देत;
गाढव होतें
उतरून घेत.



जिराफ होता
गात छान :
मानेइतकीच
लांब तान.



कोल्हा होता
दुकानदार;
त्याच्या दुधांत
पाणी फार.

मला पाहातांच
म्हणाले सारे,
"एक पिंजरा
याला द्यारे."



त्याबरोबर
आली जाग;
स्वप्नांत पाहिली
राणीची बाग.



# आटपाट नगरामध्यें

आटपाट नगरामध्यें
नाहीं होत चोरी;
हुशार मुलें काळीं; आणि
खुळीं मुलें गोरीं.



लांडग्यानें चढवली
गोंडेवाली फेझ;
म्हणाला, "मी मक्केचा
शेख इमाम बेझ."



चिंचेवरच्या घुबडानें
त्यांचा ओढला पाय;
म्हणालें, "पण शेपट्यांचें
करणार काय?"



## भीमाचें जेवण

बकासुर ओरडला,
'अलल् डुर्र';
भीमानें मारला
भुरका...'भुर्र'

बकासुरानें
मारली थप्पड,
भीम म्हणाला,
''लोणचें फक्कड!''




बकासुरानें
हाणला ठोसा;
भीम म्हणाला,
''इडली-दोसा.''

बकासुरानें
बुकलली मान;
भीम म्हणाला,
''चटणी छान !''

बकासुरानें
हाणली ठोकर;
भीमानें दिली
एक ढेकर!

बकासुरानें
मारली गदा;
भीम हसला
खदा खदा!

बकासुराला
घाम फुटला;
तेव्हां भीम
जेवून उठला.



## चिमण्ये, तुझें वजन किती?

चिमण्ये, तुझें वजन किती?
''चार माणकें, चाळीस मोती.'

कोंबड्या, तुऱ्याची किंमत काय?
''दोन हात, दोन पाय.''

कावळ्या, तुझें आजोळ कुठें?
'जिथें मिळतात तीन तिठे.''

मोरा, नाच शिकलास कसा?
''असा; असा; असा; असा.''

## भोवऱ्याचें गाणें


भिरभिर भोवऱ्या
भीर भीर,
एका पायावर
फीर फीर.

गुंगुन गुंगुन
गाणें म्हण;
नको हालूं
एक कण.

सात दिवस
फिरत राहा;
सात देश
इथून पाहा.

भिरभिर भोवऱ्या
भीर भीर,
भोवळ आली तर
पाजीन खीर!





## मैफल

एक झुरळ
रेडिओंत गेलें;
गवयी होऊन
बाहेर आलें.

एक उंदीर
तबल्यांत दडला;
तबलजी होऊन
बाहेर पडला.

त्या दोघांचें
गाणें झालें
तिकीट काढून
मांजर आलें!

म. ग्रं. सं. ठाणें,
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. दिनांक
विभाग क्र.



## पतंग आणि ठेंगू

एकदां एका मुलाचा
पतंग गुल् झाला;
ठेंगूंच्या देशामध्यें
उडत उडत गेला.

ठेंगूंच्या देशामधला
आंगठ्याएवढा पोर;
त्यानें मांजा पकडला
लावून सगळा जोर.

ठेंगूंच्या देशामध्यें
चमत्कार झाला:
पतंगाच्या बरोबर
ठेंगू उडून गेला!

# जादूचें जंगल



आफ्रिकेच्या जंगलामध्यें
नाचणारें झाड!
माडाएवढी तुळस
आणि तुळशीएवढे माड.

तुळशीएवढ्या माडावर
मांजराएवढी खार;
तिच्या मऊ पाठीवरती
ठेंगू होतो स्वार.

ठेंगू खातो खोबरें
आणि खार पिते पाणी;
आफ्रिकेच्या जंगलामध्यें
झाडें म्हणतात गाणी!

# मावशी

आटपाट नगरामध्यें
किती किती मजा!
प्रधान भरतो पाणी; आणि
रस्ते झाडतो राजा.

आटपाट नगरामध्यें
नाहीं चालत नाणीं;
एक शेर गुळासाठीं
दहा-बारा गाणीं!

आटपाट नगरामध्यें
सुटी नाहीं, बाळा,
सांग कशी सुटी असेल,
जर नाहीं शाळा?

सोलापूरहून
येते काकू;
माझ्यासाठीं
आणते चाकू.

कोल्हापूरहून
येते आत्ते;
माझ्यासाठी
आणते पत्ते.

राजापूरहून
मावशी येते;
माझा एक
पाप्पा घेते!



## परी ग परी

'परी ग परी
कोण तुझ्या घरीं?'
''मनी मांजरी स्वैपाक करी''

'परी ग परी
कोण तुझ्या घरीं?'
''उंदीर खातो श्रीखंड-पुरी.''

'परी ग परी
कोण तुझ्या घरी?'
''पोपट म्हणतो, 'हरी, हरी'.''

'परी ग परी
येऊ का घरीं?''
''दारांत विंचू पहारा करी!''



# टोक न मोडण्याचा मंत्र

तीन सालें शाळेची;
तीन सालें वेळेची;

तीन सालें चाकूची;
तीन सालें डाकूची.

तीन चोक तेरा,
एक चाकू मारा

डाकू, डाकू, डाकू,
धारवाला चाकू;

पोलादाचें पान;
टोक झाली छान.






# कावळ्याचे बेत

कावळ्यानें केलें
आपलें लगीन;
हुंडा मिळाला
रुपये तीन.

एका रुपयाचें
आणलेन् कापड
एका रुपयाचे
घेतलेन् पापड.

आणि म्हणाला,
"जमलें तर
एका रुपयात
बांधीन घर!"



# दीपावळ

## परीची करामत

अनाराच्या झाडावर
एक परी चढली;
सात वेळां पडली;
तरी नाय रडली.

तिचे सगळ्या परींनीं
कौतुक केलें फार.
फुलबाजांच्या फुलांचा
गळ्यांत घातला हार.

## लाडवांचा किल्ला

दिवाळींत आम्हीं बांधला
लाडवांचा किल्ला;
रात्री त्यावर केला
कुणी तरी हल्ला.

सगळे लोक म्हणाले,
"मुलें सांगतात खोटें."
पण भलंभटाचें पोट
झालें दुप्पट मोठें!




BVBK-0402994

## चिक्कणकाकूच्या करंज्या

दिवाळींतल्या करंज्या
शिमग्याच्या साठीं
चिक्कणकाकूनें ठेवल्या
देव्हाऱ्याच्या पाठीं.

पण त्या करंज्यांच्या
चिमण्या झाल्या छान;
डबा उघडून गेल्या
शोधित माथेरान.





## शिंदेशाही विनोद

शिंदेकाका आणतात
एव्वढा खाऊचा पुडा;
आणि मग शिंकतात
धडा, धडा, धडा.

काकांच्या शिंकण्याला
मुळी नाहीं ताळ,
म्हणतात, "माझ्या नाकांत
आहे फटाक्याची माळ!"

## पणत्या

पणती लावा
मागच्या दारी;
नाहीं होणार
कधीं चोरी.


पणती लावा
खिडकीमधेंच;
नाहींतर मनीला
लागेल ठेच.

पणती लावा
पुढच्या दारा;
पाव्हणा येईल;
गोरा, गोरा!

पणती लावा
तुळशीपाशीं;
धनधान्याच्या
पडतील राशी.

अंगणांत लावा
पणत्या साठ;
वाटसरूंना
दिसेल वाट!

म. सं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९९४ दिनांक
विषय क्र.



RANICHI BAUG
(Poetry for children)
Vinda Karandikar

राणीची बाग
(म-८२)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 81-7185-419-2

© पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.

पहिली आवृत्तीः १९६१/१८८३
दुसरी आवृत्तीः १९७५/१८९७
तिसरी आवृत्तीः १९९३/१९१५

चित्रे आणि सजावटः वसंत सरवटे

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

मुद्रक
राम प्रिंटोग्राफ
३०, शास्त्री पार्क, कृष्णनगर
दिल्ली ११० ०५१

**किंमतः रू. २५.००**

